: शोधप्रबंधाचा आराखडा :

"परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. परभणी चे कृषिपतपुरवठ्यातील योगदान : एक चिकित्सक अभ्यास"

(सन २००५-०६ ते २०१४-१५)

सामाजिकशास्त्रे विद्या शाखेच्या **अर्थशास्त्र** विषयात पीएच.डी. (Ph.D.) पदवीसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठास सादर करावयाचा शोधप्रबंधाचा आराखडा

: संशोधक :

प्रा.वाल्मिक बाबुराव भोसले

ज्ञानोपासक महाविद्यालय,

परभणी

: मार्गदर्शक :

डॉ.आर.एम. भालेराव

अर्थशास्त्र विभाग प्रमुख,

शारदा महाविद्यालय, परभणी

: संशोधन केंद्र :

अर्थशास्त्र विभाग,

ज्ञानोपासक शिक्षण मंडळाचे,

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, परभणी

मार्च २०१६

"परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. परभणीचे कृषिपतपुरवठ्यातील योगदान : एक चिकित्सक अभ्यास" (सन २००५-०६ ते २०१४-१५)

प्रस्तावना :

भारतीय शेती ही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. कृषी क्षेत्राचे आर्थिक विकासात अतिशय मोलाचे योगदान आहे. रोजगार निर्मितीचा विचार केला तर जवळपास ६० प्रतिशत लोकांना शेतीत रोजगार मिळतो. एकूण उत्पन्नाच्या २० प्रतिशत एवढे उत्पन्न शेतीतून मिळते व निर्यातीत शेती क्षेत्राचे योगदान १८ प्रतिशत मूल्याचे आहे. शेतीच्या विकासावरच उद्योगाचा विकास अवलंबून आहे. शेतीतून निघणाऱ्या कच्च्या मालाचे पक्या वस्तूत रुपांतर करण्याचे कार्य उद्योगातून होत असते तसेच उद्योगातून निर्माण होणाऱ्या वस्तू शेती उत्पादन वाढविण्यासाठी आवश्यक असतात. उदा. खते, जंतूनाशके, कीटकनाशके यांचा वापर शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी होतो. म्हणून कृषी व उद्योग परस्परावलंबी आहेत हे जरी खरे असले तरी शेती हाच उद्योगाच्या विकासाचा महत्त्वाचा घटक आहे. तसेच उदरनिर्वाहाचे साधन म्हणूनही भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला महत्त्व आहे.

भारतीय शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती इतकी सक्षम नाही की, शेतीसाठी लागणारी सर्व संसाधने ते खरेदी करु शकतील. त्यांची स्वतःची बचतही नसते त्यामुळे त्यांना कर्जावर अवलंबून राहावे लागते. तसेच सद्यपरिस्थितीत शेतीच्या अधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरु आहे. त्याचा परिणाम शेती पारंपरिक पध्दतीने करणे बंद होत आहे. पिकरचनेत परिवर्तन होत आहे. त्यामुळे नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब शेतीत करणे अनिवार्य झालेले असून त्यासाठी मोठ्या प्रमणावर भांडवलाची आवश्यकता आहे. भांडवल उपलब्ध झाले तर उत्पादनात वाढ करता यईल. त्यामुळे नवीन तंत्रज्ञानाच्या अवलंबनाची गरज पूर्ण करावयाची असेल आणि त्यासाठी लागणारे भांडवल शेतकऱ्यांकडे नसेल तर मग कर्ज घेण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

शेतीचा विकास करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करावयाचा असेल तर पतपुरवठा होणे आवश्यक आहे.

भारतीय शेती ही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. तसेच तिचा विकास पतपुवठ्यावर अवलंबून आहे. पतपुरवठ्याशिवाय कृषिबरोबर उद्योग व सेवाक्षेत्राचा विकास होऊ शकत नाही. कर्ज घेतांना दोन प्रकारचे कर्ज घेतले जाते. एक दैनंदिन गरज भागविण्यासाठी व दुसरे संबंधित संस्थेचा (शेतीची) वृध्दी व विकास करण्यासाठी दीर्घकालीन कर्ज घ्यावे लागते. या दोन्ही बाबी संबंधी विचार करता भारतातील शेतकरी खेड्यात राहतो व स्वतःच्या उदरनिर्वाहापूरतेच उत्पन्न त्याला मिळते, त्यासाठी त्याला शेतीचा विकास करण्यासाठी कर्ज घेण्याशिवाय पर्याय उरत नाही.

शेतकऱ्यांना कर्जाची गरज ही दैनंदिन खर्च करण्यासाठी देखील असते. बि-बीयाणे खरेदी, जनावरे खरेदी, कच्चामाल, नवीन शेती घेणे, जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध करणे, जुने कर्ज फेडणे, नाला खोदणे, घरदुरुस्ती करणे, विहीर खोदणे, जनावराचा चारा खरेदी करणे, जमीन महसूल भरणे, लग्न व इतर सामाजिक उत्साह साजरे करणे, दागिने खरेदी, भांडण तंट्यामुळे कोर्ट कचेरी करणे, शेतीसाठी लागणारी अवजारे, मळणीयंत्र, ट्रॅक्टर, नांगर, कीटकनाशके, जंतुनाशके खरेदी वरील वेगवेगळ्या कारणासाठी शेतकऱ्यांना कर्ज घ्यावे लागते. तसेच जमीनीचे आकारमान वाढवता येत नाही. कारण क्षेत्रफळ मर्यादित आहे. त्यामुळे क्षेत्रफळात बदल करता येत नाही. परंतु असलेली शेती आधुनिक पध्दतीने करता येते, त्यासाठी पतपुरवठ्याची गरज आहे.

भारतात शेतीक्षेत्राला जो पतपुरवठा केला जातो त्याचे दोन प्रकारात वर्गीकरण करण्यात येते. अ) संस्थात्मक कर्ज पुरवठा ब) गैरसंस्थात्मक कर्ज पुरवठा

अ) संस्थात्मक कर्ज पुरवठा :

संस्थात्मक कर्ज पुरवठा हा सरकार, सहकारी बँका आणि व्यापारी बँका यांच्याकडून केला जातो. या स्त्रोतामार्फत १९५१-५२ मध्ये केलेल्या कर्जपुरवठ्याचे प्रमाण एकूण कर्जाच्या ७.३ प्रतिशत होते. तर २००२ मध्ये हेच प्रमाण ६१ प्रतिशत झाले.

वरील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, सहकारी समित्या, सहकारी बँका यांनी केलेल्या संस्थात्मक कर्जपुरवठ्यात वाढ झाली आहे.

ब) गैरसंस्थात्मक कर्ज पुरवठा :

गैरसंस्थात्मक कर्ज पुरवठा, सावकार, नातेवाईक आणि मित्रमंडळी यांच्याकडून केला जातो. १९५१-५२ मध्ये गैरसंस्थात्मक कर्ज पुरवठा हा एकूण कर्ज पुरवठ्याच्या ९२.७ प्रतिशत होता. तर हेच प्रमाण २००२ मध्ये ३९ प्रतिशत झाले. वरील आकडेवारीवरुन असे दिसून येते की, गैरसंस्थात्मक कर्ज पुरवठ्याचे प्रमाण कमी होत आहे.

शेतीसाठी दोन प्रकारच्या कर्जाची आवश्यकता असते.

१) अल्पकालीन कर्ज

२) दीर्घकालीन कर्ज

भारतात अशाप्रकारचे कर्ज देणाऱ्या ज्या पतपुरवठा संस्था निर्माण करण्यात आल्या आहेत त्याची रचना पुढील प्रमाणे आहे.

सहकारी कर्ज पुरवठ्याची रचना

अल्प मुदतीचे कर्ज

१) राज्य सहकारी बँक
२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक
३) प्राथमिक पतपुरवठा सहकारी बँक

दीर्घ मुदतीचे कर्ज

१) राज्य (मध्यवर्ती) भू-विकास बँक
२) जिल्हा,तालुका, प्राथमिक भू-विकास बँक

सहकारी संस्थांची रचना संघीय स्वरुपाची आहे.

१)　पिरॅमीडच्या पायाशी सहकारी संस्था आहे.

२)　मध्यभागी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक.

३)　राज्यपातळीवर राज्य सहकारी बँक

थोडक्यात भारतात शेतीक्षेत्राला जो कर्ज पुरवठा केला जातो त्यात सहकारी बँका, व्यापारी बँका, ग्रामीण बँका यांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्याचबरोबर व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर या बँकांनी ग्रामीण भागात कर्जपुरवठा करावा यासाठी त्यांच्यावर काही बंधणे घालण्यात आली. तेव्हापासून सहकारी बँका, ग्रामीण बँका यांच्याबरोबर व्यापारी बँकाच्या कर्जपुरवठ्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते.

भारतातील व्यापारी बँका, ग्रामीण बँका आणि सहकारी बँका यांनी केलेला कर्ज पुरवठा
(रू.कोटी)

बँक / वर्ष	२०१०-११	२०१४-१५
व्यापारी बँका	३४५८७७	५९९६९१
ग्रामीण बँका	४४२९३	१०२४८३
सहकारी बँका	७८१२१	१३८४६९
एकूण	४६८२९१	८४०६४३

महाराष्ट्राचा विचार करता २००९-१० मध्ये प्राथमिक कृषिपतपुरवठा संस्थांनी ४३८४ कोटी रु. चे कर्ज दिले. तसेच राज्य सहकारी बँकेने २००९-१० मध्ये ९०६२ कोटी रु. चे कर्ज वाटप केले. राज्यातील ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी २००९-१० या वर्षात १९४६३ कोटी रु. चे कर्ज शेतकऱ्यांना वाटप केले.

वरील आकडेवारीवरुन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा कृषिपतपुकवठ्यातील वाटा महत्त्वाचा आहे. आज जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या शाखा ग्रामीण भागापर्यंत पोहोचलेल्या आहेत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका सहकारी पतपुरवठा संस्थामार्फत शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात कर्ज पुरवठा करतात. त्या शेतकऱ्यांना सावकाराच्या शोषणातून मुक्त करण्याचा प्रयत्न करत आहेत.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. भारतीय अर्थव्यवस्थेतील कृषीक्षेत्राच्या योगदानाचे विश्लेषण करणे.

२. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्ज व ठेवीचे सिंहावलोकन करणे.

३. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कृषिपतपुरवठ्याचा आढावा घेणे.

४. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने केलेल्या कर्ज पुरवठ्याचा तालुकानिहाय अभ्यास करणे.

५. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक स्थिताचा मागोवा घेणे.

६. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कृषिपतपुरवठ्यातील योगदान अभ्यासणे.

७. संशोधनाअंती निष्कर्ष काढून उपयुक्त शिफारशी सूचविणे.

संशोधनाची गृहितके :

१. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या एकूण कृषीपतपुरवठ्यात वाढ होत आहे.

२. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने केलेल्या कर्जपुकरवठ्यात तालुकानिहाय असमानता दिसून येते.

३. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कृषी विकासात महत्त्वाचे योगदान आहे.

संशोधन पध्दती :

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक आणि दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात येईल.

१) प्राथमिक साधनसामुग्री

प्राथमिक तथ्य संकलनासाठी लाभार्थी शेतकऱ्यांच्या अनुसूचीचा वापर करण्यात येईल. अनुसूचीसाठी लागणाऱ्या लाभार्थी शेतकऱ्यांची निवड करण्यासाठी नमुना निवड पध्दती वापरली जाणार आहे.

यादृच्छिक नमुना निवड पध्दती (Random Sampling)

आजच्या परभणी व हिंगोली जिल्ह्यात १४ तालुके आहेत. १४ तालुक्यात एकूण १११ परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या शाखा आहेत. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या एकूण १११ शाखापैकी यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने ५६ शाखांची निवड करण्यात येणार आहे.

सहेतूक किंवा उद्देशपूर्ण नमुना निवड पध्दती

परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने निवड केलेल्या ५६ शाखांमधील ३३६ लाभार्थी शेतकऱ्यांची निवड सहेतूक नमुना निवड पध्दतीने केली जाईल. सहेतून नमुना निवड पध्दतीने निवड करत असताना निवडलेल्या ५६ शाखांमधील प्रत्येक शाखेतून ६ लाभार्थी शेतकरी निवडले जातील. निवडलेल्या ६ लाभार्थी शेतकऱ्यात ३ शेतकरी अल्प भूधारक (२ हेक्टर पर्यंत) व ३ शेतकरी मोठे शेतकरी (२ हेक्टरपेक्षा जास्त) असतील. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडलेल्या ५६ शाखामधील ३३६ शेतकऱ्यांकडून अनुसूचीद्वारे माहिती घेण्यात येईल.

२) दुय्यम साधनसामुग्री

संशोधनासाठीची माहिती परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे वार्षिक अहवाल, राज्य सहकारी बँकेचे अहवाल, नाबार्डचे अहवाल, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, संदर्भ ग्रंथ, बँकाचे दस्ताऐवज, वेळोवेळी प्रकाशित केलेली माहिती, पुस्तके, नियतकालिके, मासिके, सांख्यिकीय गोषवारे तसेच विविध संकेतस्थळावर उपलब्ध असलेली माहिती इत्यादीच्या आधारे माहिती मिळवली जाईल. तसेच वेगवेगळ्या सांख्यिकीय साधनांचा वापर

करुन विश्लेषण करण्यात येईल. त्याचबरोबर तक्ता आणि आलेखाचा ऊचित ठिकाणी वापर करण्यात येईल.

संशोधनाचा कालावधी आणि मर्यादा :

"परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. परभणीचे कृषिपतपुरवठ्यातील योगदान : एक चिकित्सक अभ्यास" या विषयासाठी २००५-०६ ते २०१४-१५ हा कालावधी विचारात घेतला आहे.

परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र हे परभणी आणि हिंगोली जिल्हा असे आहे. त्यामुळे हा अभ्यास परभणी आणि हिंगोली या जिल्ह्यापूरता मर्यादित आहे.

विषयाची निवड आणि महत्त्व :

कोणत्याही क्षेत्राच्या विकासासाठी कर्जपुरवठ्याची आवश्यकता असते त्याप्रमाणे शेतीसाठीही कर्जपुरवठ्याची आवश्यकता असते. परंतु शेतीतील उत्पादन हे निसर्गावर अवलंबून असते. जसे की, कधी आवर्षण तर कधी अतिवर्षण यामुळे शेतीतील उत्पादन वाया जाते. शेतीत उत्पादन जरी नाही झाले तरीही शेतकऱ्यांला नंतर शेतीची मशागत करण्यासाठी, बी-बियाणे खरेदीसाठी व दैनंदिन गरजा भागविण्यासाठी कर्जाची गरज भासत असते. ही गरज भागविण्यासाठी संस्थात्मक व गैरसंस्थात्मक मार्गाने वित्त पुरवठा केला जातो. संस्थात्मक वित्त पुरवठ्या प्रकारात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यामुळे "परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. परभणीचे कृषिपतपुरवठ्यातील योगदान : एक चिकित्सक अभ्यास " हा विषय निवडला आहे.

प्रकरणाची रूपरेषा :

प्रकरण १ ले - प्रस्तावना

प्रकरण २ रे - परभणी जिल्ह्याची पार्श्वभूमी

प्रकरण ३ रे - संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण ४ थे - परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आर्थिक स्थितीचा आढावा

प्रकरण ५ वे - परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कृषिपतपुरवठ्यातील योगदान

प्रकरण ६ वे - निष्कर्ष व शिफारशी

संदर्भ सूची :

१. आगलावे प्रदिप, संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, १९९८, पृ.१२०-१२१

२. डॉ.कविमंडण विजय, कृषि अर्थशास्त्र, श्री.मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ.१३८

३. डॉ.कायंदे पाटील गंगाधर वि., शेतीचे अर्थशास्त्र चैत्यन्य पब्लिकेशन्स, नाशिक-१३, पृ.७.१ ते ७.५

४. डॉ.देसाई स.श्री.मु. व डॉ.भालेराव निर्मल, भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, २००४, पृ.३५

५. सुंदरम रूद्र दत्त के.पी.एम., भारतीय अर्थव्यवस्था, एस.चाँन्द अँड कंपनी लि., रामनगर, नई दिल्ली, २००२, पृ.३६९

७. मिश्रा अँण्ड पुरी, इंडियन इकॉनॉमिक प्रॉब्लेम्स, हिमालय पब्लिकेशन, न्यू दिल्ली.

८. www.mscbank.com

वार्षिके :

१. अग्रणी बँक कार्यालय, परभणी जिल्हा वार्षिक ऋण योजना, स्टेट बँक ऑफ इंडिया, अग्रणी बँक विभाग, मुंबई-२००५-२०१५

२. जनसंपर्क विभाग जिल्हा माहिती कार्यालय, परभणी, परभणी जिल्हा विकासाची वाटचाल, जनसंपर्क विभाग जिल्हा माहिती कार्यालय, परभणी, २०१५

३. जिल्हा सांख्यिकीय कार्यालय, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, अर्थ व सांख्यिकी कार्यालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००५-२०१५.

४. परभणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, परभणी, वार्षिक अहवाल २००५-२०१५

५. Economics Survey of Maharashtra २००५-२०१५

६. Reserve Bank of India, Annual Report, २०१४-१५

७. NABARD, Annual Report - २०१४-१५

मासिक :

१. योजना, प्रकाशन विभाग, माहिती आणि प्रसारण मंत्रालय, भारतसरकार.

संशोधक विद्यार्थी

(प्रा.वाल्मिक बाबुराव भोसले)
ज्ञानोपासक महाविद्यालय,
परभणी

संशोधक मार्गदर्शक

(डॉ.आर.एम. भालेराव)
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
शारदा महाविद्यालय, परभणी